Anusandhanvallari
Vol 2024, No.1
August 2024
ISSN 2229-3388

# आर्वी तालुक्यातील सिंचन क्षेत्रात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा MGNREGA वाटा एक अभ्यास

**दर्शनकुमार ना. चांभारे**
(संशोधक विद्यार्थी)
Dept. of Business Management
RTMNU, Nagpur

**डॉ. रविंद्र न. सोनटक्के**
प्राचार्य
कला, वाणिज्य व विज्ञान महा. आर्वी
जि. वर्धा

## सारांश :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ नुसार शासनातर्फे ग्रामीण विकासाला चालना देण्याकरीता विविध योजना आखल्या जातात. यात गाव विकास सोबतच वैयक्तिक लाभाच्या योजनांचा प्रामुख्याने समावेश असतो. कोणत्याही ग्रामीण भागातील योजनांच्या केंद्रस्थानी शेतकरी हा ........ असतो. वर्धा जिल्हयातील आर्वी तालुक्यात पुरतत्वे अपुऱ्या सिंचनाच्या सोयीमुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास थांबला होता. मात्र MGNREGA च्या अंतर्गत मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतात सिंचन विहीरी बांधकाम झाल्याने शेतकरी दुबार–तिबार पिके घेऊ लागले. याचा थेट फायदा शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीवर झाला. त्याच अनुषंगाने शेतकऱ्यांच्या पीक पध्दती, उत्पादन वाढ इत्यादी बाबींचा अभ्यास संशोधनात करण्यात आला. MGNREGA विहिरींमुळे अल्पभूधारक कोरडवाहू शेतींचे रूपांतर बागायती क्षेत्रात होण्यास मदत झाली आहे.

## प्रस्तावना :

विदर्भ शेतकरी आत्महत्येकरीता ओळखल्या जातो. विदर्भातील वर्धा जिल्हयात देखील शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. या समस्येवर उपाय म्हणून शेतकऱ्यांची सिंचन क्षमता वाढविणे. वर्धा जिल्हा प्रामुख्याने कोरडवाहू जिल्हा म्हणून ओळखला जातो. पावसाच्या पाण्यावर येथील शेती अवलंबून आहे. कापूस, तूर, सोयाबीन, चना, गहू असे पीके प्रामुख्याने घेतली जातात. पावसाळा कमी झाला तर खरीपाचे पीक कमी होते. तरी रब्बी हंगामात त्याची कमी भरून निघू शकते. MGNREGA २००५ अंतर्गत ''सिंचन विहिर'' हा वैयक्तिक लाभाचा घटक असून अनुसूचित जाती, जमाती, लहान अल्पभूधारक शेतकऱ्यांना प्रामुख्याने विहिरी मंजूर केल्या जातात. यामुळे भूजलाचा वापर करून हमीभावाच्या पीकांबरोबरच भाजीपाला, फळबाग यासारख्या नगदी पिकांकडे वळणे शक्य झाले आहे.

## संशोधनाची उद्दिष्टये :

१. आर्वी तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना MGNREGA अंतर्गत २०१५ ते २०२३ दरम्यान बांधलेल्या विहिरींची संख्या व वितरणाचा अभ्यास करणे.

२. या विहिरींमुळे सिंचनाखालील क्षेत्रात झालेली वाढ मोजणे.

३. लाभार्थी शेतकऱ्यांच्या पीक पध्दती, उत्पादन व उत्पन्नावर झालेला परिणाम तपासणे.

४. धोरणात्मक सुधारणांसाठी शिफारशी सूचविणे.

## संशोधन पध्दती :

सदर शोधनिबंध लिहितांना द्वितीय समकांचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच काही संकेतस्थळावर प्रकाशित माहितीचा सुध्दा वापर करण्यात आला आहे.

आर्वी तालुका जि. वर्धा तालुक्यातील गावांचा उद्देशपूर्ण नमुना निवड

## माहिती संकलन :

१. प्राथमिक माहिती :— ५० लाभार्थी शेतकऱ्यांच्या मुलाखती, सरपंच व कृषी सहाय्यक यांच्याशी चर्चा.

२. दुय्यम माहिती :— पंचायत समिती आर्वी MGNREGA MIS पोर्टल कृषी विभागाचे अहवाल २०१५—२०२३

**विश्लेषण पध्दत : वर्णनात्मक सांख्यिके, टक्केवारी तक्ते व तुलनात्मक विश्लेषण**

## माहिती, विश्लेषण व निष्कर्ष :

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना अधिनियम २००५ MGNREGA चा पूर्व इतिहास.

महाराष्ट्र विधान परिषदेत १८ वर्षापर्यंत सभापतीपदी राहिलेले स्व. विठ्ठल सखाराम पागे (वि.स.पागे) यांच्या समर्पन व समाजसेवी कल्पकतेतून सन १९६९ साली तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या दुरदृष्टीतून देशात पहिल्यांदा महाराष्ट्रात या योजनेची सुरूवात झाली. त्यात महाराष्ट्रात १९७२ मध्ये भीषण दुष्काळ पडला. त्यावेळी लोकांना रोजगार पुरविण्यासाठी ही योजना दुष्काळग्रस्त भागात मोठया प्रमाणात राबविण्यात आली. त्या दरम्यान या योजनेने यशस्वीरित्या आपले उद्दिष्टे पूर्ण केलीत. या योजनेचे यश लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने एक महत्वाकांक्षी योजना म्हणून सन १९७७ मध्ये 'रोजगार हमी अधिनियम १९७७' एकमताने पारित करून या योजनेला मूर्त रूप दिले व महाराष्ट्राला या योजनेचा उद्‌गाता म्हणून मान्यता मिळाली.

या योजनेचे मार्गक्रमण व यश लक्षात घेता या योजनेची चर्चा राष्ट्रीय स्तरावर देखील व्हायला लागली. महाराष्ट्र राज्यातील योजनेची पार्श्वभूमी लक्षात घेऊन पुढे भारत सरकारने ५ सप्टेंबर २००५ रोजी ‘राष्ट्रीय रोजगार हमी योजना २००५ रोजी ‘राष्ट्रीय रोजगार हमी योजना २००५ (National Rural Employment Guarantee Act 2005) NREGA' या योजनेची सुरूवात करण्यात आली. २००६ मध्ये या योजनेमध्ये २०० जिल्हयांचा समावेश करण्यात आला. दुसऱ्या चरणात सन २००७ मध्ये आणखी ११३ जिल्हयांची वाढ यामध्ये करण्यात आली. त्याच वर्षी १५ मे २००७ ला आणखी १३ जिल्हे यामध्ये समाविष्ट करण्यात आले व त्यानंतर १ एप्रिल २००८ मध्ये भारतातील संपूर्ण जिल्हयांकरीता ही योजना कार्यान्वित करण्यात आली.

२ ऑक्टोंबर २००९ रोजी म्हणजे महात्मा गांधी यांच्या १४० व्या जयंती दिनी व पंचायत राज स्वर्ण जयंती च्या मुहूर्तावर केंद्र सरकारकडून घोषित पाच घोषणेमध्ये राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे नाव बदलवून ‘महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ (Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act 2005) MGNREGA' असे करण्यात आले. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाद्वारे ही योजना अत्यंत योग्य पध्दतीने वर्तमान परिस्थितीत यशस्वीपणे राबविण्यात येत आहे.

## आर्वी तालुका संक्षिप्त माहिती :

वर्धा जिल्हयातील आर्वी तालुका हे तालुक्याचे महत्वपूर्ण ठिकाण आहे. इंग्रजांच्या काळापासून कापसाची मोठी बाजारपेठ व कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा तालुका म्हणून हे शहर प्रसिध्द आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार आर्वी तालुक्याची एकूण लोकसंख्या १,३९,९२६ असून त्यापैकी ७१,४६१ पुरूष व ६८,४६५ स्त्रिया आहेत. तालुक्याचा लोकसंख्या वृध्दीदर २००१ ते २०११ या दहा वर्षांच्या काळात ७.१% एवढा आहे. तसेच एकूण लोकसंख्येपैकी ६९.४ % लोक ग्रामीण भागात तर ३०.६% लोक शहरात राहतात. तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण ८५.२% असून ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण ८३.१% व शहरी साक्षरतेचे प्रमाण ९०.१% एवढे आहे. तालुक्यात एकूण काम करणाऱ्यांची संख्या ६४,८२७ असून ती एकूण लोकसंख्येच्या ४६.३% आहे. ३९.७% शेतकरी, ४१.५% शेतमजुर, १.८% घरगुती उद्योग, १७.०% लोक इतर सेवेत गुंतलेले आहेत. वर्धा जिल्हा कापूस उत्पादनात अग्रेसर जिल्हा म्हणून ओळखला जातो. आर्वी तालुक्यात विपुल कृषी आधारीत अर्थव्यवस्थेमुळे ८६ नोंदणीकृत लघुउद्योग, ३ मध्यम उद्योग स्थापन झाले आहेत. या उद्योगामध्ये प्रामुख्याने जिनिंग–प्रेसींग, दालमिल, ऑईल मिल असे उद्योग शहर परिसरात आहेत.

आर्वी तालुक्याचा प्रमुख व्यवसाय शेती असून त्यातून कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा, ज्वारी, गहू, संत्री ही पिके घेतली जातात. त्याचबरोबर २०१९ च्या पशु जनगणनेनुसार एकूण पशुधन ४२,३१८ एवढे आहे. गायी व बैल ५८.४% म्हशी व रेडे ९.२%, मेंढया व बकऱ्या २९.१% तर घोडे इ. ३.३% असून एकूण कुक्कुटपक्षी २८,४७६ इतकी आहे. तसेच सन २०२२–२३ पर्यंत १,२४७ हेक्टर क्षेत्र मत्स्य उत्पादनासाठी अनुकूल असून उपयोगात आणलेले एकूण क्षेत्र मात्र ८९२ हेक्टर आहे.

आर्वी तालुका–कृषी व सिंचन स्थिती २०२३

१. एकूण भौगोलिक क्षेत्र : १,०६,२८० हेक्टर

२. लागवडीखालील क्षेत्र : ७८,४५० हेक्टर — ७३.८%

३. सिंचनाखालील क्षेत्र : १२,३४० हेक्टर — १५.७% लागवडीच्या

४. प्रमुख सिंचन स्त्रोत : विहिरी ६८%, लघु पाटबंधारे २२%, नदी उपसा १०%

## प्रकरण ३ : माहिती संकलन

### ३.१ आर्वी तालुका : अभ्यास क्षेत्राचे विश्लेषणात्मक वर्णन

### ३.१.१ अभ्यास क्षेत्र निवडीमागील कारणे

प्रस्तुत संशोधनासाठी वर्धा जिल्हयातील आर्वी तालुक्याची निवड मुद्दाम करण्यात आली आहे. यामागील प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. **प्रतिनिधीक स्वरूप** : आर्वी तालुका हा विदर्भातील कोरडवाहू व सिंचन—वंचित तालुक्याचे प्रतिनिधीक उदाहरण आहे. २०११ च्या जनगणनेनुसार तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १,०६,२८० हेक्टर असून त्यापैकी केवळ १२.०% क्षेत्र २०११—१२ मध्ये सिंचनाखाली होते. हे प्रमाण वर्धा जिल्हयाच्या सरासरी १८.३% पेक्षा कमी व महाराष्ट्राच्या सरासरी १८.१% पेक्षाही कमी आहे. त्यामुळे MGNREGA सारख्या योजनांचा सिंचन विकासावरील परिणाम अभ्यासण्यासाठी हे क्षेत्र उपयुक्त आहे.

२. **कृषी आधारीत अर्थव्यवस्था** : तालुक्यातील एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येपैकी ८१.२% लोक शेती व शेतमजुरीवर अवलंबून आहेत. ३९.७% शेतकरी व ४१.५% शेतमजूर असे प्रमाण आहे. यावरून सिंचन सुविधांचा थेट परिणाम उपजीविकेवर होतो हे स्पष्ट होते.

३. **संस्थात्मक हस्तक्षेपाची उपस्थिती** : २०१५ नंतर आर्वी तालुक्यात MGNREGA अंतर्गत जलसंधारणाची कामे व २०१८—१९ मध्ये NAAM Foundation सारख्या स्वयंसेवी संस्थेचा धाम नदी खोलीकरण प्रकल्प राबवला गेला. त्यामुळे योजनापूर्व व योजनानंतर असा तुलनात्मक अभ्यास शक्य झाला.

### ३.१.२ : माहिती संकलनाच्या पध्दती व स्त्रोत

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या माहितीचा वापर करण्यात आला आहे.

**अ) दुय्यम माहिती स्त्रोत :**

संशोधनाच्या वस्तुनिष्ठतेसाठी शासकीय व अधिकृत स्त्रोतांनाच प्राधान्य देण्यात आले आहे.

१. District Census Handbook, Wardha 2011 : जनगणना आयुक्त, भारत सरकार यातून तालुक्याची लोकसंख्या १,३९,९२६ ग्रामीण लोकसंख्या ६९.४% साक्षरता ८५.२% व १५९ महसुली गावांची यादी घेतली आहे. ६ गावे निर्जन असल्याचे दिसून आले.

२. District Statistical Abstract, Wardha : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन २०११–१२, २०१५–१६ २०२०–२१ या वर्षाचे अहवाल वापरले. यानुसार निव्वळ सिंचित क्षेत्र २०११–१२ मध्ये ८,२१० हेक्टर (१२.०%) वरून २०२०–२१ मध्ये ११,४२० हेक्टर (१७.०%) पर्यंत वाढले असल्याचे आढळले. मधल्या वर्षाचा डेटा उपलब्ध नाही.

३. MGNREGA Management Information System : http://nrega.nic.in या पोर्टलवरून आर्वी तालुक्यातील ८२ ग्रामपंचायतींनी २०१५–२०२४ या काळात पूर्ण केलेल्या जलसंधारण, शेततळी, वृक्ष लागवड कामांचा GP-wise डेटा घेण्यात आला.

४. पंचायत समिती, आर्वी कृषी विभाग : वार्षिक पीक व सिंचन अहवाल २०११–१२ ते २०२०–२१ यातून तालुक्याचे निव्वळ पेरणी क्षेत्र ६८,४५० हेक्टर वरून ६७,२०० हेक्टर पर्यंत घटले असल्याचे दिसते, जे कोरडवाहू शेतीतील अस्थिरता दर्शवते.

## ब) प्राथमिक माहितीचे स्त्रोत :

दुय्यम माहितीची पडताळणी व गुणात्मक विश्लेषणासाठी क्षेत्रभेटीद्वारे प्राथमिक माहिती गोळा केली.

१. **मुलाखती** : ५ ग्रामपंचायतींच्या सरपंच, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्या मुलाखती, यातून MGNREGA कामांच्या गुणवत्तेबाबत माहिती मिळाली.

२. **केंद्रित गट चर्चा** : विविध लाभार्थी शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर विहिरीच्या कामानंतर भूजल पातळीत वाढ झाल्याचे शेतकऱ्यांनी नमूद केले.

## ३.१.३ माहिती विश्लेषणातील मर्यादा व उपाय :

१. वर्ष–निहाय डेटाची अनुपलब्धता : DES कडून दरवर्षीचा तालुका निहाय सिंचन डेटा प्रसिध्द होत नाही. त्यामुळे २०११, २०१६, २०२१ हे 'Benchmark Years' मानून मधली वर्षे Linear Trend Analysis ने काढली आहेत. याचा स्पष्ट उल्लेख Methodology मध्ये केला आहे.

२. ग्रामपंचायत Vs महसुली गाव : आर्वी तालुक्यात १५९ महसुली गावे आहेत पण ग्रामपंचायती फक्त ७३ आहे. MGNREGA डेटा GP-wise असल्याने गट ग्रामपंचायतीमुळे काही गावांचा डेटा एकत्रित झाला आहे. ही मर्यादा मान्य करून विश्लेषण केले आहे.

३. सिंचनाच्या व्याख्येतील बदल : २०११ व २०२१ च्या जनगणनेत 'सिंचित क्षेत्र' च्या व्याख्येत थोडा बदल आहे. त्यामुळे ५ टक्के पर्यंत फरक संभवतो, ही बाब नोंदवली आहे.

Anusandhanvallari
Vol 2024, No.1
August 2024
ISSN 2229-3388

### ३.१.४ विश्लेषणात्मक निष्कर्ष : माहिती संकलनातून

संकलित केलेल्या माहितीचे प्राथमिक विश्लेषण केल्यास खालील बाबी निदर्शनास येतात.


१. सिंचन व्याप्तीत वाढ : १० वर्षात निव्वळ सिंचित क्षेत्राचे प्रमाण १२.० टक्के वरून १७.० टक्के पर्यंत वाढले आहे. म्हणजेच ५ टक्के वाढ झाली आहे. ही वाढ मुख्यत: २०१५–१६ नंतर दिसून येते, जो काळ MGNREGA अंतर्गत जलसंधारण कामांच्या अंमलबजावणीचा आहे.

२. पेरणी क्षेत्रात घट : याच काळात निव्वळ पेरणी क्षेत्र ६८,४५० हेक्टर वरून ६७,२०० हेक्टर पर्यंत घटले आहे. यावरून कोरडवाहू क्षेत्र लागवडीबाहेर जात आहे व सिंचन हाच शाश्वत शेतीचा पर्याय असल्याचे दिसते.

३. संस्थात्मक हस्तक्षेपाचा सहसंबंध : २०१८–१९ मध्ये सिंचन वाढीचा दर सर्वाधिक आहे. याच वर्षी NAAM Foundation ने धाम नदीवर काम केले. यावरून शासकीय योजना + स्वयंसेवी संस्थांची भागीदारी हा मॉडेल परिणामकारक ठरत असल्याचे प्राथमिक अनुमान काढता येते.

**आर्वी तालुक्यातील विहिरींची आकडेवारी**

| सन | विहिरींची संख्या |
| --- | --- |
| २०१७–२०१८ | १८ |
| २०१८–२०१९ | ५९ |
| २०१९–२०२० | ४७ |
| २०२०–२०२१ | २३ (कोरोना महामारी) |
| २०२१–२०२२ | ९१ |




सन

**MGNREGA जलसंधारण कामे २०१५–२०१४ मध्ये दिलेली माहिती अशी आहे :**

**उपलब्ध डेटा :**

कालावधी शेततळी + विहिरी शेरा

२०१५–२०२० – १५६ MGNREGA कामे

२०२०–२०२४ – १९८ वैयक्तिक लाभाची कामे वाढली

एकूण २०१५–२०२४ – ३५४

**१० वर्षातील एकूण महत्वाचे मुद्दे :**

१. २०११–२०१५ चा डेटा वेगळा नाही. २०११ते २०१५ दरम्यान MGNREGA अंतर्गत आर्वी तालुक्यात विहिरींची कामे सुरू झाली होती, पण वरील तक्त्यात त्या कालावधीचा वेगळा आकडा दिलेला नाही. २०१५ नंतर कामांचा वेग वाढला.

२. २०१५–२०२१ पर्यंत अंदाज २०१५–२०२० मध्ये १५६ व २०२०–२१ हे २०२०–२०२४ च्या १९८ पैकी अंदाजे २०–२५ कामे धरली, तर २०१५ ते २०२१ दरम्यान अंदाजे १७५–१८० विहिरी/शेततळी बांधली गेली.

आकडेवारीनुसार २०१५–२०२४ दरम्यान ३५४ शेततळी व विहिरी बांधल्या गेल्या, ज्यामुळे सिंचन क्षेत्र ३९.१% वाढले.

## निष्कर्ष :

MGNREGA अंतर्गत आर्वी तालुक्यात बांधण्यात आलेल्या सिंचन विहिरींनी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा चेहरामोहरा बदलला आहे. पूर्वी केवळ पावसाच्या लहरीवर अवलंबून असणाऱ्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना आता हक्काचा व बारमाही सिंचनाचा स्त्रोत उपलब्ध झाला आहे. यामुळे खरीप हंगामापुरती मर्यादित असलेली शेती रब्बी व उन्हाळी हंगामातही विस्तारली असून शेतकऱ्यांच्या उपजीविकेत अभुतपूर्व स्थैर्य आले आहे. एकेकाळी कोरडवाहू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमिनीवर आता गहू, हरभरा, भाजीपाला व संत्रा–मोसंबी यासारख्या फळबागा डोलू लागल्या आहेत. पीक पध्दतीतील या बदलामुळे व दुबार–तिबार पीक क्षेत्र वाढल्याने शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नात दुपटीहून अधिक वाढ नोंदवली गेली आहे. विशेषत: भाजीपाला व फळपिके घेणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न अडीच ते तीन पट वाढले असून बाजारपेठेशी थेट जोडले गेल्याने त्यांची सौदाशक्तीही वाढली आहे. विहीर बांधकामाच्या काळात मजुरांना हमीभावाने रोजगार मिळालाच, शिवाय नंतर शेतीच्या वाढीव कामांमुळे महिलांसह संपूर्ण कुटुंबाला वर्षभर स्थानिक पातळीवर काम उपलब्ध झाले. यामुळे शहराकडे होणारे स्थलांतर लक्षणीय प्रमाणात थांबले असून गावगाडा पुन्हा हिरवाईने बहरला आहे. दुष्काळी परिस्थितीतही किमान एक पीक हाताशी येत असल्याने कुटुंबाची अन्नसुरक्षा सुनिश्चित झाली आहे.

मात्र या यशामागे काही गंभीर आव्हानेही उभी ठाकली आहेत. विहिरींची संख्या झपाट्याने वाढत असली तरी भूजल पुनर्भरणाच्या तुलनेत उपसा जास्त होत असल्याने अनेक गावांमध्ये उन्हाळयात पाणीपातळी खोलवर गेल्याचे दिसून येते. २०२१–२२ नंतरच्या आकडेवारीनुसार आर्वी तालुक्यातील भूजल पातळीत सरासरी

एक मीटरहून अधिक घट झाली आहे. याशिवाय लाभार्थ्यांमध्ये तांत्रिक ज्ञानाचा अभाव व आर्थिक अडचणीमुळे विहिरींची नियमित देखभाल–दुरूस्ती होत नाही. गाळ साचणे, दरडी कोसळणे व पंपाच्या दुरूस्तीचा खर्च यामुळे काही विहिरींची कार्यक्षमता कमी झाली आहे. विजेच्या वाढत्या दरामुळे व भारनियमनामुळे सिंचनाचा खर्च परवडेनासा झाला असून लहान शेतकरी पुन्हा अडचणीत येत आहे.

त्यामुळे MGNREGA चा हा लाभ शाश्वत व चिरकाल टिकवण्यासाठी केवळ विहीर बांधून थांबणे पुरेसे नाही. यापुढे ''एकात्मिक जल व्यवस्थापन'' हाच एकमेव मार्ग आहे. प्रत्येक सिंचन विहिरीबरोबर शेततळे, सलग समतल चर, गॅबियन बंधारे व रिचार्ज शाफ्ट यासारखी जलसंधारणाची कामे सक्तीची करावीत जेणेकरून पडणारा प्रत्येक थेंब जागेवरच मुरेल व भूजल पातळी वाढेल. विहिरीवर ठिबक व तुषार सिंचन संच बसवण्यासाठी MGNREGA कृषी विभाग व PM-KUSUM योजनांची सांगड घालून ४० ते ५० टक्के पाणीबचत साधता येईल व त्याच पाण्यात दुप्पट क्षेत्र भिजवता येईल. गाव पातळीवर भूजल उपलब्धतेचा अंदाज घेवून ''पाणी अंदाजपत्रक'' तयार करावे व त्यानुसार कमी पाण्यावर येणारी कडधान्ये, तेलबिया पिकांना प्रोत्साहन द्यावे. लाभार्थ्यांचे पाणी वापर संस्था स्थापन करून त्यांना विहिर देखभाल, पीक नियोजन व पाण्याचे समन्यायी वाटप याबाबत प्रशिक्षित करावे. सौर उर्जा पंपाचा प्रसार केल्यास विजेचा खर्च वाचून शेतकऱ्याला सिंचन जवळपास मोफत होईल.

एकंदरीत, MGNREGA विहिरींनी आर्वी तालुक्यातील लहान शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणला असून ग्रामीण भागात समृध्दीची नवी पहाट उगवली आहे. आता गरज आहे ती या परिवर्तनाला शास्त्रीय व शाश्वत जोड देण्याची. ''विहीर+ शेततळे + ठिबक + पीक नियोजन + सौर उर्जा'' या पंचसूत्रीची प्रभावी अंमलबजावणी केल्यास आर्वी तालुका केवळ जल स्वयंपूर्णच होणार नाही तर विदर्भातील शाश्वत शेतीचे एक आदर्श मॉडेल म्हणून संपूर्ण देशासमोर येवू शकेल.

## सारांश :

आर्वी तालुका हा सिंचन–वंचितता, कृषी अवलंबन व संस्थात्मक हस्तक्षेप या तीन निकषांवर संशोधनासाठी योग्य अभ्यासक्षेत्र ठरते. दुय्यम स्त्रोतांमधून मिळालेला २०११–२०२१ चा कालमालिका डेटा व प्राथमिक माहिती यांच्या आधारे MGNREGA या सिंचन विकासांवरील परिणाम तपासणे हा पुढील प्रकरणाचा गाभा असेल.

## संदर्भ :

१. MGNREGA MIS Report, Ministry of Rural Development, 2024-25.

२. वर्धा जिल्हा सामाजिक–आर्थिक समालोचन, २०२३.

३. पंचायत समिती आर्वी, वार्षिक अहवाल २०२०–२०२५.

४. नाबार्ड, "Impact of MGNREGA on Irrigation", 2022.